**नि.दि.दा. क्र.३२/२०१८**
**उकुंडराव वि. शालीकराम**
**नि.क्र.६४**

**वादीतर्फे सा.क्र.५ याचा अधिकचा सरतपास श्री एम.डी. पालीवाल वकील साहेबांमार्फत शपथेवर सुरुः**

१. मी माझ्या पुराव्याचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.६४ वर दाखल केला आहे त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीला असुन तो खरा व बरोबर आहे.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास प्रतिवादीतर्फे श्री पी.एस. सायरे वकील साहेब यांच्या मार्फत शपथेवर सुरु**

२. माझे शिक्षण वर्ग ९ पर्यंत झाले आहे. मला लिहीता वाचता येते. माझा जन्म सन १९४८ मधील आहे. जन्मतारीख दाखविण्याकरिता माझ्याकडे आधारकार्ड आहे. मी हरीभाऊ आहे या करिता वकीलसाहेबांना पुरावा दिला होता. मला साक्ष देणेकामी न्यायालयाचा समन्स आला नव्हता. मला साक्ष देणेकामी वादी रमेश याने सांगितले. हे म्हणणे खरे नाही की वादीच्या सांगण्याप्रमाणे मी साक्ष देत आहे. महागु, पुण्या व तिम्या यांच्या वडीलांचे नाव तुकाराम होते. तुकाराम कोणत्या वर्षी मरण पावले हे माझ्या लक्षात नाही. माझे मुळ गाव खापा हे आहे. माझ्या शपथपत्रातील मजकूर मी वाचले ते बरोबर आहे. हे म्हणणे खरे नाही की शपथपत्रातील मजकूर माझे मूळ गाव काळापाठा आहे हे चुकीचे आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की ५५ ते ६० वर्षांपासून मी काळापाठा येथे राहत आहे. मी लग्नानंतर काळापाठा येथे राहायला गेलो. हे म्हणणे खरे नाही की मी सन १९७० ते १९७२ या काळात काळापाठा येथे राहायला गेलो. हे म्हणणे खरे आहे की मी सन १९४० पासून काळापाठा येथे राहत आहे.

३.	हे म्हणणे खरे आहे की, पुण्या, तिम्या व महागु यांच्यामध्ये आपसी वाटणी झाली होती. हे माझ्या लक्षात नाही की महागु कोणत्या वर्षी खापा येथे राहायला गेला होता. हे म्हणणे खरे आहे की जेव्हा महागु खापा येथे राहायला गेला तेव्हा त्याची आर्थिक स्थिती बरोबर नव्हती. हे म्हणणे खरे आहे की महागु याने त्याचा हिस्सा पुण्याला विकला. हे म्हणणे खरे नाही की वादीच्या सांगण्यावरुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की खोटे पुराव्याचे शपथपत्र सादर केले.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2025.07.10 15:20:16 +0530

**(जी.ओ. वानखडे)**
**दि.न्या. क. स्तर, पारशिवनी**

**समक्ष**

GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2025.07.10 15:20:23 +0530

**(जी.ओ. वानखडे)**
**दि.न्या. क. स्तर, पारशिवनी**

**दिनांकः १०/०७/२०२५**